**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४**

# प्रकटन

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकान्वये खालील प्रमाणे कळविण्यात येते की,

१) खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी साठी नावनोंदणी अर्ज (अर्ज क्र.१७) ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणताही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही याची दक्षता घ्यावी,

विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज दि. २९/०७/२०१९ पासून ते दिनांक २४/०८/२०१९ या कालावधीत ऑनलाईन **(ONLINE)** भरावयाचे आहेत. भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून दि.३०/०७/२०१९ ते दि.२६/०८/२०१९ या कालावधीत विहीत शुल्क व कागदपत्रांसह अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळेमध्ये जमा करावी.

संबंधित संपर्क केंद्र प्रमुखांनी त्यांच्याकडे प्राप्त सर्व अर्ज यादी व शुल्कासह दि .३०/०८/२०१९ पर्यंत विभागीय मंडळाकडे जमा करावेत.

२) प्रत्येक विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत. त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

## संकेतस्थळ:

## इ.१० वी - http://form17.mh-ssc.ac.in

३) विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास द्वितीय प्रत व प्रतिज्ञाप्रत २) आधार कार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्याकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत मंडळाकडे कागदपत्रे सादर करताना जोडणे आवश्यक आहे.

४) कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व इ-मेल आयडी. पुढील संपर्कासाठी अनिवार्य **(compulsory)** आहे.

५) संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत घ्यावी.

६) विद्यार्थ्यांनी अर्ज, विहीत शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेमध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

७) खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे

इ.१० वी रु.१०००/- नोंदणी शुल्क + रु. १००/- प्रक्रिया शुल्क **(Processing fee)**

८) विद्यार्थ्यांनी शाळेत अर्ज व शुल्क जमा केल्यानंतर संबंधित शाळांनी सर्व अर्ज एकत्रित करुन पुढील नमुन्यातील यादी, मूळ अर्जासोबतची कागदपत्रे व शुल्क संबंधित विभागीय मंडळात जमा करुन त्याबाबतची पोहोच घ्यावी. कोणताही विद्यार्थी या सुविधेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव | शुल्क (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|

९) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या संपर्क केंद्राने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन करावयाचे आहे.

१०) विहित शुल्क रोखीने शाळेमध्ये जमा करावयाचे आहे. शाळेनी अर्जासोबत दिलेल्या पावत्यांपैकी विद्यार्थ्यांसाठीच्या प्रतींवर स्वाक्षरी व शिक्का देऊन ती विद्यार्थ्यांकडे द्यावी. पावतीची दुसरी प्रत अर्जासोबत जोडून विभागीय मंडळाकडे पाठवावयाची आहे. पावतीची तिसरी प्रत शाळा/क.महाविद्यालयाने स्वत:कडे संग्रहित ठेवावयाची आहे.

११) विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत छाननीसाठी प्राप्त झालेली मूळ कागदपत्रे अर्जाची छाननी झाल्यानंतर संपर्क केंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना परत करण्यात यावीत. सदर कागदपत्रे त्यांचेमार्फत विद्यार्थ्यांना परत मिळाल्याची खातरजमा करावी.

१२) दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ठ व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्यचिकित्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

१३) सर्व प्रक्रिया ऑनलाईन होणार असल्याने यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे.

१४) ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक **०२०-२५७०५२०८/ २५७०५२०७/२५७०५२७१** वर संपर्क साधावा.

१५) पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना संपर्क केंद्रामार्फत करुन द्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ ,कोल्हापूर.